(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/पोउपनि बि.सं. (अभि.) ते पोनि बि.सं. (अभि.)/६२/२०२३ दिनांक:- २६ /०७/२०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि. १४/०७/२०२१

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून सन २०२३-२४ ची निवडसूची तयार केली आहे. सदर निवडसुचीमध्ये पात्र ७ अधिकाऱ्यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)** " या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल संवर्ग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | प्रमोद लक्ष्मणराव महाडीक | मुंबई शहर (ठाणे ग्रामीण येथे बदली आदेशित) | कोकण-२ | मुंबई शहर |
| २. | अशोक वसंतराव सद्भावे | संचालक कार्यालय, पुणे | छत्रपती संभाजी नगर | बिनतारी संदेश, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| ३. | मिलिंद वसंतराव मोरे | मुंबई शहर | कोकण-२ | मुंबई शहर |
| ४. | जितेंद्र रामकृष्ण पवार | संचालक कार्यालय, पुणे | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| ५. | रघुराज भारतसिंग चव्हाण | सोलापूर शहर | पुणे | सोलापूर ग्रामीण |

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल संवर्ग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६. | राजाराम दत्तात्रय पोपळघट | मुंबई शहर (संचालक कार्यालय, पुणे येथे बदली आदेशित ) | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| ७. | विष्णु रामचंद्र कांबळे | सोलापूर ग्रामीण (कोल्हापूर येथे बदली आदेशित) | पुणे | सांगली |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. पदोन्नती झालेल्या पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापूर्वी ते ज्या घटकांत जाणार आहेत, त्या घटक प्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. रिक्त पद नसल्यास तसे हया कार्यालयास कळवावे.

६. सदर पदोन्नती आदेशामधील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे
परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर / कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर / कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण /सांगली / ठाणे ग्रामीण / कोल्हापूर
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / बिनतारी संदेश, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१ / महाराष्ट्र राज्य, नागपूर -२

प्रत,

पोलीस निरीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) ते पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) / PSI W/L (ENG.) to PI W/L (ENG.) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २ / ९ / ११ / ११-अ / ३६ / ४०.

( संजीव कुमार सिंघल )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.